**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धिपत्रक**
23.01.2025

- **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एन.एच. हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांना मध्ये रंगली कचरा वर्गीकरणाची स्पर्धा**

दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत "स्वच्छतेची पाठशाळा" हा उपक्रम एन.एच. हायस्कूल येथे राबविण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांना कचरा वर्गीकरणाचे महत्त्व, वर्गीकरण कसे करावे, क्यूआर कोड, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील कचऱ्यावरील प्रक्रिया पद्धत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच Segregation100@Home - कचऱ्याच्या चार प्रकारच्या वर्गीकरणाविषयी तसेच स्वच्छतेचे महत्व आदींवर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. याप्रसंगी, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्रमांक ०५ प्रियांका भोसले, स्वच्छता निरीक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे व कचऱ्याच्या वर्गीकरणाचे महत्त्व त्यांना पटवून देणे हा या उपक्रमा मागील प्रमुख उद्देश आहे. मा. आयुक्त यांनी स्वतः विद्यार्थ्यांना चार प्रकारच्या कचरा वर्गीकरणाबाबत माहिती दिली व त्यांच्याशी संवाद साधला. Segregation100@home म्हणजे घरापासूनच कचऱ्याचे १०० टक्के वर्गीकरण. या स्वच्छतेची पाठशाळा प्रसंगी मा. आयुक्त व विद्यार्थ्यांमध्ये प्रश्नोत्तराचा तास घेण्यात आला तसेच विचारलेल्या प्रश्नांचे अचूक उत्तर दिल्यामुळे मा. आयुक्तांनी विद्यार्थ्यांचे कौतुक देखील केले. तदनंतर, मुले आणि मुली अश्या दोन गटात कचरा वर्गीकरण या विषयास अनुसरून स्पर्धा घेण्यात आली. सुका कचरा, ओला कचरा, घरगुती घातक कचरा आणि सॅनिटरी कचरा या चार प्रकारच्या कचऱ्याचे अचूक वर्गीकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये शर्यत लागली. विद्यार्थ्यांनी अचूक प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण केल्याने मा. आयुक्त यांनी विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित केले. विद्यार्थ्यांपासून सुरुवात केल्याने त्यांच्या घरात, सोसायटी परिसरात, शेजारी व मित्रवर्ग यांच्यामध्ये त्यांच्या सहाय्याने स्वच्छता व कचऱ्याचे वर्गीकरण याबाबत जनजागृती करणे सोपे होईल असे मा. आयुक्त यांनी सांगितले. तसेच, विद्यार्थी हे या समाजाचे भविष्य आहे आणि त्यांच्यापासूनच स्वच्छतेच्या जनजागृतीची सुरुवात केल्याने कचरामुक्त मिरा भाईंदर शहर हे स्वप्न साकार होण्यासाठी मोलाचा हातभार लागणार असल्याच्या भावना मा. आयुक्त यांनी व्यक्त केल्या.